# रघुनाथ माशेलकर रिलायन्सची नोकरी करतात हाफकीनचे भवितव्य त्यांच्या हाती का सोपविले?

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडे**कृत

रघुनाथ माशेलकर हे फार मोठे शास्त्रज्ञ आहेत. वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन मंडळाचे ते अकरा वर्षे अध्यक्ष होते. संशोधनाचे कार्य करणाऱ्या सरकारी समित्यांवर त्यांना आवर्जून स्थान दिले जायचे. २०१४ साली त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मात्र शासकीय कार्यकाळ संपल्यानंतर लगेचच ते रिलायन्स कंपनीकडे वळले. गेली अनेक वर्षे ते रिलायन्स इंडस्ट्रीच्या संचालक मंडळावर स्वतंत्र सदस्य म्हणून नियुक्त आहेत. रिलायन्सने 'रिलायन्स इनोव्हेशन कौन्सिल' स्थापन केली. रिलायन्स कंपनी वेगाने पुढे मार्गक्रमण करण्यासाठी वेगवेगळ्या नवीन योजना, कल्पना यावर संशोधन करणे हे या कौन्सिलचे प्रमुख कार्य आहे. पुण्यात आणि नवी मुंबईत यासाठी प्रचंड मोठी कार्यालये स्थापन केली आहेत. अशा या कौन्सिलच्या अध्यक्षपदी रघुनाथ माशेलकर यांना रिलायन्स कंपनीने घेतले असून कौन्सिलच्या पुणे कार्यालयात बसून रघुनाथ माशेलकर काम करतात.

रघुनाथ माशेलकर हे रिलायन्सची नोकरी करतात असेच साध्या भाषेत म्हणावे लागेल. या गोष्टीला आक्षेप असावा का? तर आक्षेप असण्याचे काहीच कारण नाही. सरकारी नोकरी संपल्यावर कुणी कुणासाठी काम करायचे हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. पण याच रघुनाथ माशेलकर यांना सरकारने एका समितीवर नेमले आहे त्या नेमणुकीला आक्षेप आहे. संपूर्ण भारतात लसींचे व इतर औषधांचे संशोधन व उत्पादन हाफकीनमध्ये होते. पण सरकारी कंपन्या बुडीत काढण्यात माहीर असलेली 'भांडवलशाही' सरकारे आणि राजकारणी यांनी अत्यंत पद्धतशीरपणे हाफकीन तोट्यात आणले. आता हाफकीन गळ्यापर्यंत दलदलीत डुबल्यानंतर ते वाचविण्याचे नाटक सुरू झाले आहे. या नाटकाचा शेवटचा प्रयोग म्हणजे हाफकीनला गतवैभव कसे आणायचे यासाठी सरकारने समिती स्थापन केली आणि या समितीच्या अध्यक्षपदी रिलायन्ससाठी काम करणारे रघुनाथ माशेलकर यांची नेमणूक केली. या नेमणुकीला आक्षेप आहे. सरकारी महामंडळ वाचविण्यासाठी स्थापन केलेल्या समितीच्या अध्यक्षपदी भांडवलदारी प्रणालित काम करणाऱ्या तज्ज्ञाला नेमायचे हा मोठा विरोधाभास आहे. रिलायन्सच्या कार्यालयात बसून काम करणारे रघुनाथ माशेलकर हे हाफकीनमध्ये संथगतीने खासगीकरण आणण्याचा प्रस्ताव देऊ शकतात. हाफकीनमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मनात हीच धास्ती आहे. रघुनाथ माशेलकर यांच्याऐवजी सरकारमध्ये काम करणारे कोणीही उत्तम वैज्ञानिक, संशोधक यांची नेमणूक का केली नाही हाही सवाल सर्वांनाच भेडसावत आहे.

हाफकीन अडचणीत कशी आणली हे सर्वांनाच माहीत आहे. सरकारमध्ये जो मंत्री होतो तो हाफकीनच्या गाड्या वापरतो, त्यांचे खासगी सचिव हाफकीनची निवासस्थाने स्वत:च्या कुटुंबीयांसाठी देतात, मंत्र्यांच्या निकटवर्तीयांना कंत्राटी पद्धतीवर हाफकीनमध्ये नेमून त्यांच्यामार्फत हवे ते निर्णय घेतले जातात. हा भ्रष्टाचारही अगदी वरवरचा आहे. केंद्रीय अणुसंशोधन केंद्राला हाफकीनमधील जवळजवळ ५ एकर जागा देऊन टाकली आहे. जळगावपासून ठिकठिकाणी असलेली हाफकीनची उत्पादन केंद्र बंद करून ती जागा गिळण्याचे षडयंत्र सुरू आहे. हा भ्रष्टाचारदेखील वरवरचा आहे.



खरा भ्रष्टाचार हा हाफकीन बंद करण्याच्या दृष्टीने जी पावले टाकली जात आहेत त्यात दडलेला आहे. हाफकीनमध्ये ज्या लसी तयार होतात, त्यासाठी जगभरातून मागणी असूनही त्याची ऑर्डरच घेतली जात नाही. याबाबत कधी जास्त आरडाओरड होईल असे वाटले तर ऑर्डर घेतली जाते, पण ऑर्डरच्या वेळेत उत्पादन तयार होणार नाही अशीच व्यवस्था करतात. म्हणजे ज्याची ऑर्डर मिळाली आहे त्याचा कच्चा मालच वेळेत येऊ द्यायचा नाही. यामुळे ऑर्डर तर रद्द होतेच, पण वेळेनंतर आलेला कच्चा माल तसाच पडून राहतो आणि तोटा वाढतो. काही लसींचे उत्पादन करायला दोन-तीन महिने लागतात. अशा लसींचे उत्पादन बंदच करून टाकायचे आणि मग ऑर्डर आली की ऐनवेळी उत्पादन करायला सांगायचे. जे शक्य होत नाही. जळगावसारख्या ठिकाणी उत्पादन करण्यासाठी किमान जितके कर्मचारी लागतात तितके कर्मचारीच ठेवलेले नाहीत. म्हणजे ऑर्डर आली तरी कर्मचारीच नाहीत म्हणून उत्पादन होत नाही. हे सर्व प्रकार करून हाफकीनला आलेली ऑर्डर पुण्यातील एका खासगी कंपनीकडे वळवायची हा प्रकार सर्व उच्चपदस्थांच्या आशीर्वादाने बेलगाम सुरू आहे. हाफकीनमध्ये अतिशय उच्च दर्जाचे खोकल्याचे औषध तयार होऊन दहा रुपयांना मिळते. पण या औषधाची जाहिरात केली तर खासगी बड्या कंपन्यांची औषधे विकली जाणार नाहीत. यासाठी हाफकीनमध्ये तयार झालेल्या अत्यंत उत्तम औषधांची कधी फूटभरही जाहिरात कधी केली नाही.

हे दुखणे केवळ हाफकीनचे नाही. सर्व सरकारी आस्थापनात हेच सुरू आहे. उत्पादन मारायचे, तोटा वाढवायचा, सरकारी कंपन्या चालत नाहीत म्हणून बोंबा मारायच्या, कंपनी हळूहळू बंद करायची आणि कामगारांना वाऱ्यावर सोडायचे हा भांडवलशाहीच्या झुल्यावर बसलेल्या सरकारांचा उद्योगच आहे. सरकारी कंपनी बंद करण्यासाठी पहिले पाऊल म्हणजे कंपनी कशामुळे तोट्यात आहे हे माहीत असूनही त्यावर विचार करायला समित्या नेमायच्या. या समित्यांनी यावर प्रायव्हेट पब्लिक पार्टनरशिपचा उपाय सुचवायचा. काही विभागांचे खासगीकरण करायचे आणि मग वेगाने कंपनीच गिळून टाकायची हे ठरलेले असते. हाफकीनसाठी सरकारने जी समिती नेमली ती 'रिलायन्स'च्या माशेलकरांच्या अध्यक्षतेखाली नेमली याला जो विरोध आहे तो यासाठीच आहे. रघुनाथ माशेलकरांच्या गुणवत्तेबद्दल जराही शंका नाही. त्यांच्याबद्दल मनात सन्मानच आहे. पण मराठीत एक म्हण आहे- 'असंगाशी संग आणि प्राणाशी गाठ'. रघुनाथ माशेलकर एका बड्या भांडवलदाराच्या कंपनी बोर्डावर अनेक वर्षे आहेत. अशा संशोधकाच्या हाती हाफकीनचे भवितव्य सोपवणे योग्य नाही. कारण शेवटी जसा चष्मा घालतो तसेच जग दिसते. हाफकीनच्या बचावासाठी नेमलेल्या समितीवर माशेलकरांची नियुक्ती यासाठीच धोकादायक आहे. या नियुक्तीची धास्ती वाटते.